महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान
सन २०१९-२० पर्यंत सुरु ठेवणे.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्र. मफुअ-२०१५ / प्र.क्र. ५४ / जल-८**
मादाम कामा मार्ग, राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक : ०१ एप्रिल,२०१५.**

**वाचा :**

**शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**

(१) क्र.जलसं-२००२/प्र.क्र.५८१/जल-७, दिनांक २८ फेब्रुवारी, २००२.
(२) क्र.जलसं-२००२/प्र.क्र.६७०/जल-७, दिनांक २९ नोव्हेंबर, २००२.
(३) क्र.जलसं-१००३/प्र.क्र.७९/जल-८, दिनांक १८ जून, २००३.
(४) क्र.जलसं-१००४/प्र.क्र.४७/जल-८, दिनांक २४ ऑगस्ट, २००४,
(५) क्र.जलसं-१००४/प्र.क्र.४७/जल-८, दिनांक १४ सप्टेंबर, २००५.
(६) क्र.जलसं-१००५/प्र.क्र.९५/जल-८, दिनांक २४ फेब्रुवारी, २००६.
(७) क्र.जलसं-२००६/प्र.क्र.१३४/जल-८ दिनांक ५ एप्रिल, २००७.
(८) क्र.जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८,दिनांक १८ सप्टेंबर, २००८.
(९) क्र.जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८,दिनांक २० फेब्रुवारी, २००९.
(१०) क्र.जलसं-२००९/प्र.क्र.३४/जल-८, दिनांक १ जुलै, २००९.
(११) क्र.जलसं-२०१०/प्र.क्र.१३/जल-८, दिनांक १८ मार्च, २०१०.
(१२) क्र.जलसं-२०११/प्र.क्र.१६/जल-८, दिनांक ३० मार्च, २०११.
(१३) क्र.मफुअ २०१२/ प्र.क्र.३७ / जल-८ दिनांक २८ मार्च, २०१२.
(१४) क्र.मफुअ-२०१३ /प्र.क्र.६२ / जल-८ दिनांक ०५ एप्रिल, २०१३.
(१५) क्र.मफुअ-२०१४ /प्र.क्र. ३० / जल-८ दिनांक ०७ मार्च, २०१४.

**प्रस्तावना :**

राज्यातील पर्जन्याधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढविणे, अत्यंत मौल्यवान असे पाणी व माती यांचे संवर्धन करणे, पडीक जमिनीचा विकास करणे, रोजगार उपलब्धतेत वाढ करणे आणि पर्यायाने कृषि उत्पादनात वाढ करुन मौल्यवान भूसंपत्तीमध्ये स्थायी स्वरुपाची सुधारणा करणे याकरीता महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान राज्यात दिनांक १ मे, २००२ पासून सुरु करण्यात आले. हे अभियान प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या लोकसहभागाद्वारे राबविण्यात आले. लोकसहभागातून राबविलेल्या या अभियानाचे ठोस यश पाहता हे अभियान सन २००२-२००३ पासून सातत्याने राबविण्यात आले आहे. सन २०१४-१५ मध्ये हे अभियान राबविण्यास संदर्भाधीन दिनांक ०७ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली होती. तथापि जलयुक्त शिवार अभियान हे ०५ वर्ष राबविण्यात येणार असल्याने व या अभियानात महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियानचा समावेश असल्याने सदर अभियान सन २०१९-२० पर्यंत सुरु ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> :

राज्यातील पाण्याची उपलब्धता व वारंवार येणारी दुष्काळ सदृश्य परिस्थिती लक्षात घेता जलसंवर्धनाच्या कार्यक्रमाचे अनन्य साधारण महत्व आहे. यासाठी पाणलोट विकासाचा कार्यक्रम राज्यात विविध योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येतो. पाणलोट विकासाद्वारे तयार करण्यात आलेल्या जलस्त्रोतांची या कार्यक्रमाद्वारे योग्य देखभाल व दुरुस्ती झाल्यास मोठया प्रमाणात पाण्याची उपलब्धता होऊ शकेल. महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान हे प्रामुख्याने राज्यातील ग्रामीण भागातील जल, भूमी व इतर नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये स्थायी स्वरुपात सुधारणा करण्याच्या दृष्टीने दिनांक १ मे, २००२ पासून राबविण्यात येत आहे. हे अभियान मुख्यत: स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेच्या लोकसहभागाद्वारे आता पर्यंत राबविले जात आहे. तथापि, ख-या अर्थाने या अभियानाचे भौतीक सदृष्य परिणाम जेंव्हा राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून निधी मिळण्यास सूरुवात झाली तेंव्हा दृष्टीपथात येवू लागले. या अभियानास प्रथमत: सन २०११-१२ पासून राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून निधी मिळण्यास सूरुवात झाली. सन २०११-१२ ते २०१४-१५ मध्ये अनुक्रमे रु. रू.३०.०० कोटी, रू.७० कोटी, रु. २६.०० कोटी आणि रु. ७५.०० कोटी निधी उपलब्ध झालेला आहे. या उपलब्ध निधीतून अनुक्रमे १४९८, १४९४ आणि ९२४ मिळून ३९१६ जलस्त्रोत दुरुस्ती, ६९४७, ४६१ आणि ३१२ मिळून ७७२० कोल्हापूरी पध्दतीचे बंधा-यांना गेट बसवण्यात आले आहेत. तर सन २०१२-१३ ते २०१४-१५ मध्ये अनुक्रमे २३३२ आणि ६४२ मिळून २३९७४ हेक्टर क्षेत्रफळात खोल सलग समतल चर, तसेच २६४५ आणि ३५० मिळून २९९५ विहिरींचे पुनर्भरण करण्यात आले आहे. या उपलब्ध निधीतून उपरोक्त उद्दिष्ट साध्य करण्यात आल्याने महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान सन २०१९-२० पर्यंत सुरु ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अभियानाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण यासाठी संदर्भाधीन दिनांक २८ फेब्रुवारी, २००२ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या खालील समित्या या पुढेही कार्यरत राहतील.

(१) <u>राज्यस्तरीय सुकाणू समिती</u>

मा.मंत्री (जलसंधारण) - अध्यक्ष

(२) <u>विभागीय स्तर समिती</u>

विभागीय आयुक्त - अध्यक्ष

(३) <u>जिल्हास्तरीय समिती</u>

जिल्हाधिकारी - अध्यक्ष

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सह अध्यक्ष

३. **अभियानातील सर्व साधारण कामे:**

(१) पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत संवर्धनासाठी पारंपारिक नालाबंडीग-गॅबियन बंधारे, विहिर पुनर्भरण, वनराई बंधारे इत्यादी तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने विकसित केलेले अपारंपारिक तंत्रज्ञान (बीबीटी, फॅक्चर सील सिमेंटेशन, बोअर ब्लास्टींग) यासारखी कामे

(२) गेल्या २०-३० वर्षामध्ये विविध योजनांतर्गत घेतलेले (पाझर तलाव, लघु सिंचन तलाव,नाला बंडींग व सांडवा फुटतूट दुरुस्ती) गांव तलाव व पारंपारिक शिवकालीन व ब्रिटिश कालीन तलाव यांच्यामध्ये असलेला गाळ काढणे व आवश्यक अशी विशेष दुरुस्ती करणे. सार्वजनिक विहिरीतील गाळ काढणे, विहिरींचे खोलीकरण करणे.

(३) पाझर तलावाची विशेष दुरुस्ती व बळकटी करणे, नालाबंडीगची विशेष दुरुस्ती करणे.

(४) मूलस्थानी जलसंधारण सध्या जाणवणारे पाण्याचे दुर्भिक्ष विचारात घेता जमिनीतील ओलाव्याचा पुरेपुर वापर करण्यासाठी कमी खर्चाच्या मशागतींचा विविध पध्दतींचा अवलंब कसा करावा याबद्दलचे प्रात्यक्षिक दाखविणे.

(५) पारंपारिक जलस्त्रोत बळकटीकरण: अभियानाचा मुख्य भर हा जुन्या जलस्त्रोताच्या बळकटी करण्यावर आहे.

(६) कोल्हापूर तथा लघु सिंचन तलावांची विशेष दुरुस्ती.

(७) राज्यातील पाणलोट विकासाची अपुरी कामे प्राधान्याने पूर्ण करुन राज्यातील प्रत्येक तालुक्यातील पाणलोट विकासाची उत्तम प्रात्यक्षिके तयार करणे.

(८) **वैशिष्टपूर्ण कामे: पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण करणे.**

**४.** अभियानातील पावसाळ्यापूर्वी करावयाची प्रमुख कामे (Focused Activities)**:**

(४.१) गाळ काढणे

(४.२) लघु सिंचन योजना / बंधारे /बांध दुरुस्ती.

(४.३) मुलस्थानी जलसंधारण

(४.४) विहीर पुनर्भरण.

(४.५) प्रसिध्दी

**५.** अभियानातील पावसाळ्या अखेरीस करावयाची कामे:

(५.१) कच्चे बंधारे

(५.२) वनराई बंधारे बांधणे

(५.३) कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे: गेटस् बसविणे

**६. गाळ काढणे कार्यपध्दती:**

अभियान कालावधीत गावातील / गावाजवळील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करण्यासाठी गाळ काढण्याच्या बाबीस विशेष जोर देण्यात यावा.

**पाणीसाठ्याचे अनुज्ञेय प्रकार** :

(१) सर्व तलाव (लघु सिंचन तलाव, पाझर तलाव व पांरपारिक तलाव)

(२) सर्व बंधारे

(३) सार्वजनिक विहिरी: पिण्याच्या पाण्याच्या विहिरींना प्राधान्य द्यावे.

**प्राधान्य ठरविणे :**

ग्रामपंचायत / ग्रामसभा यांनी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतास बळकटी येण्यासाठी कोणत्या स्त्रोतातून गाळ काढावयाचा आहे या बाबत ठराव करुन शिफारस करणे.

(१) या वैशिष्टपूर्ण कामामध्ये गाळ काढण्यास प्राधान्य राहिल.

(२) या अभियानांतर्गत उपलब्ध होणारा गाळ सुपीक व कसदार असल्याने जमिनीचा पोत सुधारण्यासाठी तसेच उत्पादन वाढविण्यासाठी निश्चीत उपयुक्त आहे. सदर गाळ मागणी केलेल्या शेतकऱ्याला त्यांच्या उपलब्ध वाहनातून स्वखर्चाने मोफत शेतात नेण्याची मुभा राहिल.

**अंमलबजावणी यंत्रणा :** सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीद्वारे ही कामे करण्यात यावीत. तथापि अपवादात्मक परिस्थितीत पंचायत समितीद्वारे अथवा इतर शासकीय यंत्रणेद्वारे कामे घेता येतील.

**७. निधीचा स्त्रोत:** हे अभियान लोक चळवळीद्वारे व लोकसहभागातून राबविण्यात येणार असले तरी या अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व मागास भागासाठी अनुदान निधी योजना (BRGF) इत्यादी योजनांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीचा देखील उपयोग करण्यात यावा. या अभियानात राबवावयाच्या मुख्य उपक्रमासाठी पुढीलप्रमाणे निधी उपलब्ध करून घेण्यात यावा.

| उपक्रम | निधीचा स्त्रोत |
|---|---|
| गाळ काढणे ( नियोजन विभाग शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२०११ / प्र.क्र. १८ / रोहयो-१ दिनांक २२ मार्च २०११ | MGNREGA व BRGF निधी + लोकसहभाग |
| विहिर पुनर्भरण | MGNREGA व BRGF निधी + लोकसहभाग |
| मुलस्थानी जलसंधारण | जनजागृती कार्यक्रम (कृषि विभाग) |

**८. अभियानाचा कालावधी:**

मृद व जलसंधारण कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेऊन विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर दरवर्षी दिनांक ११ एप्रिल, (महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती) ते दिनांक ०१ जुलै, (कै. वसंतराव नाईक यांची जयंती) या कालावधीत महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियानाचे महत्व विस्तृत करावे. अभियानाचा अभियानाचा कालावधी ०१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०२० असा राहिल.

**९. प्रसिध्दी:**

सदर अभियानांतर्गत घेण्यात येणारी वरील परिच्छेदातील बहुतांशी कामे येत्या पावसाळ्यापूर्वी हाती घेतल्यास पावसाळ्यानंतर पाण्याच्या साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होईल. हे लक्षात घेता विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावर वरील निर्देशा प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करुन आणि व्यापक प्रसिध्दीद्वारे अभियान अधिकाधिक लोकाभिमुख करण्यात यावे. अभियानात राबवावयाचे उपक्रम / कार्यक्रम याचा कालबध्द विस्तृत कार्यक्रम आणि सूचना आयुक्त (कृषि) यांनी स्वतंत्रपणे निर्गमित कराव्यात. स्थानिक पातळीवर या कार्यक्रमाच्या जास्तीतजास्त प्रचाराकरिता पोस्टर, घडी पत्रिका, स्थानिक वृत्तपत्रातून जाहिराती इत्यादी माध्यमाच्या अधारे प्रसिद्ध करावी. जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्राम पंचायत मार्फत स्थानिक लोकप्रतिनिधीच्या उपस्थितीत आणि सहभागाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे, बस स्थानकावर जिंगल्सद्वारे तसेच गावांमध्ये पथनाट्य, वगनाट्य व कलापथकाद्वारे तसेच पोवाड्याद्वारे अभियानाची प्रसिध्दी करावी.

**१०. अहवाल सादरीकरण:**

विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी गठीत केलेल्या वरील समित्यांच्या वेळोवेळी बैठका घ्याव्यात. या अभियान कालावधीत प्रत्येक जिल्हाधिका-याने एक सर्वंकष अहवाल दरवर्षी माहे जुलै, आणि सविस्तर माहे मार्च अखेर पर्यंत शासनास पाठवावयाचा आहे. या अहवाला सोबतच्या दस्तऐवजांमध्ये केलेल्या कामाच्या पुष्ठ्यर्थ (Support) पूर्वीचे व सध्याचे छाया चित्र (Photo), चित्रफित (Video) व वर्तमानपत्रातील कात्रणे इत्यादी पाठवावेत. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी देखील सर्व क्षेत्रीय यंत्रणेमार्फत या अभियानास व्यापक प्रसिध्दी द्यावी व झालेल्या कार्यवाहीचा अहवाल वरीलप्रमाणे शासनास सादर करावा.

**११.** सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१५०४०११३४८५९५२२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: CN = Vinod S Wakhare, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.04.04 16:12:20 +05'30'

**(वि. सि. वखारे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. विरोधी पक्ष नेते विधानपरिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव महाराष्ट्र विधान मंडळ मुंबई
४) सर्व सन्माननिय सदस्य संसद / विधानपरिषद / विधानसभा
५) मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७) मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री , यांचे खाजगी सचिव
८) कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती,
९) मुख्य सचिव यांचे सहसचिव,
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) आयुक्त (कृषि), व मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरिय पाणलोट विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य,
१२) महासंचालक, कै.वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन,
१३) अपर कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरिय पाणलोट विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
१६) मुख्य अभियंता, लघु सिंचन ( जलसंधारण) विदर्भ सघन सिंचन कार्यक्रम, पुणे व नागपूर
१७) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१९) सर्व जिल्हाधिकारी,
२०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२१) सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२२) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२३) सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय
२४) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२५) सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
२६) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),

२८) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२९) सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
३०) सर्व मुख्य वनसंरक्षक,/ सर्व उपवनसंरक्षक,
३१) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
३२) उपसंचालक, सामाजिक वनीकरण,
३३) महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
३४) ग्रामीण विकास ट्रस्ट, ठाणे विभाग.
३५) Water and Power Consultancy Services (India) Ltd. (WAPCOS), लातूर विभाग.
३६) Watershed Organisation Trust (WOTR), औरंगाबाद विभाग.
३७) Agriculture Finance Corporation Ltd. (AFC), नागपूर विभाग.
३८) दिलासा जनविकास प्रतिष्ठान, नाशिक विभाग.
३९) Action for Food Production (AFPRO), पुणे विभाग.
४०) Action for Agricultural Renewal in Maharashtra (AFARM), कोल्हापूर विभाग.
४१) NABARD Consultancy Services (P) Ltd. (NABCONS), अमरावती विभाग
४२) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
४३) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
४४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (३ प्रती)
४५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
४६) सर्व लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र शासन,
४७) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४८) सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४९) जल-८ (निवड नस्ती),जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई